जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

**प्रेसनोट** **दिनांक १२.११.२०२४**

# "ठाणे पोलीस आयुक्तालयाकडुन सायबर गुन्हयांबाबत नागरीकांना जाहीर आवाहन"

सध्याच्या आधुनिक युगात तंत्रज्ञानाचा वापर करून गुन्हा करण्यामध्ये वाढ होत आहे. गुन्हेगारांकडून व्हॉट्सअॅप, इन्स्टाग्राम, फेसबुक अशा सोशल मिडीयामधून सर्वसामान्य नागरीकांची वैयक्तिक माहिती मिळविली जाते. पोलीस अधिकारी आणि तपास यंत्रणेतील अधिकारी यांचे सोशल मिडीयामधील फोटो स्टेटसवर ठेवून व्हॉट्सअॅप मॅसेज तसेच व्हिडीओ कॉल करून, सोबत पोलीस कार्यवाही संबंधातील बनावट कागदपत्रे पाठवून नागरिकांना भिती दाखविली जाते आणि त्यांच्या बॅंक खात्यांची तपासणी करण्याचा बहाणा करून त्यांचे बॅंक डिटेल्स प्राप्त करून घेवून मोठया प्रमाणात आर्थिक फसवणुक केली जात आहे.

त्या अनुषंगाने सर्व नागरीकांना सायबर गुन्ह्यांबाबत सायबर पोलीस ठाणे यांच्याकडुन खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहे.

१. 'मोबाईल कंपनी तुमचा फोन डिस्कनेक्ट करणार आहे' असा कॉल आल्यास त्यास प्रतिसाद देऊ नये.
२. FedEx कुरियर कंपनीच्या नावाने पार्सल संदर्भात कॉल आल्यास त्यास कोणताही प्रतिसाद देवू नये अथवा त्यांनी सांगितलेल्या माहितीवर विश्वास ठेवून कोणतीही कृती करू नये.
३. पोलीस अधिकारी असल्याचे सांगून आपल्याकडे आधार कार्डबाबत माहिती विचारल्यास अशा व्यक्तींना किंवा कोणत्याही अनोळखी व्यक्तीला आधारकार्ड, पॅनकार्ड, एटीएम, डेबीट कार्ड इ. ची माहिती देवू नये.
४. पोलीस अधिकारी किंवा केंद्रिय तपास यंत्रणेचे अधिकारी बोलत आहे, तुमच्यासाठी आलेल्या पार्सलमध्ये अनाधिकृत मोबाईल सिमकार्ड आहेत,ड्रग्ज आहेत, तुमच्या विरुध्द गुन्हा नोंद आहे, तुम्हाला डिजीटल अरेस्ट करण्यात आली आहे' अशी बतावणी करून आर्थिक फसवणूक केली जात असल्याने अशा प्रकारचे कॉल आल्यास कोणताही प्रतिसाद न देता तात्काळ पोलीस तपास यंत्रणेशी संपर्क करावा.
५. WhatsApp, Instagram, Facebook यावर कोणत्याही अपरिचीत व्यक्तीची फ्रेंड रिक्वेस्ट किंवा मेसेज प्राप्त झाल्यास त्यास कोणताही प्रतिसाद देवू नये.
६. कोणत्याही ऑनलाईन पेमेंट वॉलेटची सुरक्षितता नियमीतपणे पडताळावी आणि पुर्णत: खातरजमा करून सुरक्षित ऑनलाईन व्यवहार करावेत.
७. भारतीय सैन्य दलाची व्यक्तींच्या नावाने जुन्या वस्तू व फर्निचरची विक्री करण्याच्या जाहिराती देवून त्याद्वारे अनेक नागरीकांची आर्थिक फसवुणक झालेली आहे, तरी अशा जाहिरातींना बळी पडू नका. अनोळखी व्यक्तीकडून आलेल्या व्हिडीओ कॉलला प्रतिसाद देवू नये.
८. आपला वापरता मोबाईल फोन क्रमांकाची सेवा अचानक बंद झाल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ मोबाईल सेवा पुरविणाऱ्या कंपनीच्या प्रतिनिधीशी अथवा कस्टमर केअरला कॉल करून खात्री करावी.
९. सोशल मिडीयावर आलेल्या कोणत्याही अनोळखी वेबसाईटला व्हिजीट करु नये अथवा कोणतीही लिंकवर योग्य खातरजमा केल्याशिवाय क्लिक करु नये.
१०. आपल्या मोबाईल क्रमांकावर कोणत्याही अनोळखी इसमाने त्याचे बॅंक खात्यातुन चुकून तुमच्या बॅंक खात्यात पैसे ट्रान्सफर झाले आहे असा कॉल/मेसेज केल्यास त्यास त्वरीत प्रतिसाद न देता सदर रक्कम आपल्या बॅंक खात्यात आली आहे किंवा नाही याची प्रथम खातरजमा करावी व नंतर पुढील कार्यवाही करावी.

११. आपण आर्थिक फसवणूकीस बळी पडले असल्यास किंवा फसविले जाण्याची शक्यता वाटल्यास तात्काळ १९३० या सायबर हेल्पलाईनवर तात्काळ कॉल करून आपली तक्रार नोंदवा किंवा शासनाचे www.cybercrime.gov.in या संकेतस्थळावर आपला मोबाईल क्रमांक रजिस्टर करून तक्रार नोंदवावी. तसेच नजीकचे अथवा सोयीचे पोलीस ठाण्याशी संपर्क करावा.

लक्षात ठेवा सायबर गुन्हयांपासून स्वत:स सुरक्षित ठेवायचे असल्यास
अकारण भिती, लालच आणि अनोळखी व्यक्तीवरील विश्वास यांना दुर ठेवा.

**सतर्क रहा !!! सुरक्षित रहा !!!**

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर